सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य

महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

**(महाराष्ट्र पोलीस राजपत्र विभागीय भाग ६- अ करिता)**

**क्र.पोमसं/४/१०(७)/लो.स.नि.-२०२४-सपोनि.बदल्या/११६/२०२४,** मुंबई, दि.: - २२/०८/२०२४

वाचा :- १. महाराष्ट्र पोलीस कायदा-१९५१,
२. मा.भारतीय निवडणुक आयोग, नवी दिल्ली यांचे क्र.437/6/1/INST/ECI/FUNCT/MCC/2024, दि.३१/०७/२०२४ चे पत्र
३. या कार्यालयाचे क्र.पोमसं/३/१०/६/विधानसभा निवडणूक-२४/८५/२०२४, दि.०२/०८/२०२४ चे ज्ञापन
४. या कार्यालयाचे क्र.पोमसं/३/१०/६/विधानसभा निवडणूक-२४/८५/२०२४, दि.०८/०८/२०२४ चे ज्ञापन
५. मा.मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालयाचे क्र. संकीर्ण-२०२४/प्र.क्र.१७/२४/निवडणूक-२, दि. २२/०८/२०२४ चे पत्र

**-: आ दे श :-**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूका-२०२४ च्या अनुषंगाने उपरोक्त संदर्भ क्र. २ च्या पत्रान्वये, मा. भारतीय निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मार्गदर्शनपर सूचना / निर्देशांनुसार सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्ग वगळून) व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक/ पोलीस उप महानिरीक्षक यांच्याकडून बदलीपात्र पोलीस अधिकाऱ्यांची माहिती उपरोक्त संदर्भ क्र. ४ च्या ज्ञापान्वये मागविण्यात आली होती.

२. त्यानुसार महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ मधील कलम-२२ न (२) मधील तरतुदींनुसार पोलीस आस्थापना मंडळ क्र.२ यांनी अपवादात्मक प्रकरण, जनहितार्थ आणि प्रशासकीय निकडीनुसार त्यांना सक्षम प्राधिकारी म्हणुन प्रदान असलेल्या अधिकाराचा वापर करुन, तसेच, मा. भारतीय निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे खालील नमुद सहायक पोलीस निरीक्षकांच्या त्यांच्या नावांसमोर दर्शविलेल्या रकाना क्र. ४ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी बदली करण्यास पोलीस आस्थापना मंडळक्र. २ यांनी मा.मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांच्या कार्यालयाच्या सल्लामसलतीने निर्णय घेतला असुन, मा.मुख्य निवडणुक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांच्या कार्यालयाने उपरोक्त संदर्भ क्र. ०५ च्या पत्रान्वये सदरहु बदल्या करण्यास सहमती दिलेली आहे:-

| अ.क्र. | स.पो.नि. यांचे नाव | सध्याची नेमणूकीचे ठिकाण | नविन नेमणूकीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. |
| १. | वैशाली विजय सरवदे | ठाणे शहर | मुंबई शहर |
| २. | ज्योती योगेश कडू | सोलापूर शहर | राज्य गुप्तवार्ता विभाग |
| ३. | नंदकिशोर पंडीतराव सोळुंके | सोलापूर शहर | छ.सं.नगर परिक्षेत्र |

22.08

**(के. एम. मल्लिकार्जुन प्रसन्ना)**
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरीता.

**प्रत,**

पोलीस आयुक्त, मुंबई शहर (सस्नेह सादर)
पोलीस आयुक्त, ठाणे शहर

Scanned with ACE Scanner

आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस आयुक्त, सोलापूर शहर
विशेष पोलीस महानिरीक्षक, छ.सं.नगर परिक्षेत्र

२. उपरोक्त नमूद घटक प्रमुखांनी बदलीवरील नियुक्तीच्या ठिकाणासंदर्भात मा. न्यायालयाचे अथवा मा.न्यायाधिकरणाचे स्थगिती आदेश असल्यास ते विचारात घेवून कृपया पुढील कार्यवाही करावी.

३. मा. भारतीय निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांनी दि.३१/०७/२०२४ च्या पत्रान्वये तसेच वेळोवेळी देण्यात आलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे व या सूचनांचा भंग होणार नाही याची कृपया दक्षता घ्यावी.

४. सदरचे आदेश घटक कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे निर्गमित करण्यात येत असून, त्यामध्ये काही त्रुटी राहिल्या असल्यास तसे या कार्यालयास कळवून पुढील आदेशाची वाट पहावी / काही अधिकाऱ्यांची तक्रार असल्यास ह्या कार्यालयास त्वरित कळवावी.

५. उपरोक्त घटक प्रमुखांनी त्यांच्या घटकात हजर झालेल्या पोलीस अधिकाऱ्यांची नांवे व त्यांच्या घटकातून बदली ठिकाणी कार्यमुक्त केलेल्या पोलीस अधिकाऱ्यांची नावे हजर झालेल्या / कार्यमुक्त केलेल्या दिनांकासह या कार्यालयास कळवावीत. जे पोलीस अधिकारी बदली ठिकाणी कार्यमुक्त करुनही अद्याप हजर झालेले नाहीत त्यांचा कार्यमुक्त केल्याचा दिनांक या कार्यालयास कळवून त्यांच्याविरुध्द घटक प्रमुखांनी या कार्यालयाचे क्र.पोमसं/३/५५०७/०६/९७, दि.१३/०२/१९९७ च्या परिपत्रकातील सूचनांप्रमाणे शिस्तभंगविषयक कार्यवाही तातडीने सुरु करावी. सदरची माहिती या कार्यालयातील लक्षवेध:- वरिष्ठ कार्यालय अधीक्षक, कार्यासन क्र. ४ यांना ई-मेल आयडीवर [desk4.dgoffice@mahapolice.gov.in] पाठवावी.

**प्रत सविनय सादर,**

मा. मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-३२.
अपर मुख्य सचिव (गृह), महाराष्ट्र शासन, मंत्रालय, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई-३२.
**(लक्षवेध :-**कक्ष अधिकारी, पोल-५ब**)**
महालेखाकार-०१, महाराष्ट्र राज्य, मुंबई / महालेखाकार-०२, महाराष्ट्र राज्य, नागपूर.

**प्रत आवश्यक त्या कार्यवाहीसाठी,**

कार्यालय अधीक्षक, का. क्र. ९ / ११ / ३६ व ४० (पोमसं. कार्यालय).

**प्रत,**

पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक यांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२/- कृपया, सदरचे आदेश विधानसभा सार्वत्रिक निवडणुका - २०२४ च्या अनुषंगाने सहायक पोलीस निरीक्षक यांचे बदली आदेश (Transfer order of API for General Elections to Vidhansabha - 2024) या विषयाखाली पोलीस महासंचालक कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर ०१ महिन्यासाठी उपलब्ध करुन द्यावेत.

Scanned with ACE Scanner